महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १२८ वा दिनांक : १३/०२/२०२५ वार : गुरूवार

# महिला आयोगाच्या अध्यक्षांवरच अश्लील टिपण्णी



**मुंबई** : राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्या विरोधात समाज माध्यमांवर आक्षेपार्ह आणि अश्लील पोस्ट केल्याप्रकरणी महिला आयोगाच्या वतीने पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीनुसार आता पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. जाणीवपूर्वक आक्षेपार्ह पोस्ट वारंवार होत असल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. त्यांचा पहिला तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच यासंबंधी गॅझेट प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यामुळे महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणून रूपाली चाकणकर या काम पाहत आहेत. मात्र राज्यातील महिलांच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या महिला आयोगाच्या अध्यक्षा यांच्यावरच आक्षेपार्ह पोस्ट होत असल्याने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. आता या प्रकरणी पोलिसांनी कारवाई केली असून दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. या बाबत मिळालेल्या माहितीनुसार फेसबुक पेज 'राजकारण महाराष्ट्राचे' या वरुन ही अश्लील टिपण्णी करण्यात आली आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखील १९९३ मध्ये महिला आयोगाची स्थापना करण्यात आली होती. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला आणि अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तसेच समाजातील महिलांची स्थिती सुधारण्यासाठी, महिला हक्कांसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखील १९९३ मध्ये या महिला आयोगाची स्थापना करण्यात आली होती. महिलांवर होणारे अत्याचाराला आणि अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तसेच समाजातील महिलांची स्थिती सुधारण्यासाठी महिला हक्कांसाठी हा आयोग काम करतो. त्यामुळे या आयोगाला अनेक अधिकार देखील देण्यात आले आहेत. राज्यातील राजकारणाच्या दृष्टिकोनातून हे पद तेवढेच महत्त्वाचे देखील मानले जाते.

महिला आणि बालविकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ हा तीन वर्षांचा असतो. सध्या या आयोगाची जबाबदारी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या रूपाली चाकणकर यांच्यावर आहे. येत्या चार महिन्यांपूर्वी चाकणकर यांचा कार्यकाळ संपणार होता. मात्र, पूर्वीच आयोगाच्या अध्यक्षपदाची धुरा पुन्हा एकदा त्यांच्याकडेच सोपवण्यात आली आहे. या संदर्भात गॅजेट प्रसिद्ध करण्यात आले होते. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वीच महायुतीच्या वतीने राज्यपाल नियुक्त १२ आमदारांपैकी सात आमदारांचा शपथविधी पार पडला होता. त्यातच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांना देखील विधान परिषदेची आमदारकी मिळणार? अशी चर्चा होती. मात्र, त्यांच्या नावाला पक्षातीलच महिला नेत्यांनी विरोध केला होता. त्यामुळे ऐनवेळी त्यांचे नाव या यादीतून वगळण्यात आल्याचे बोलले जात होते.

# समरजित घाटगे आणि मंत्री हसन मुश्रीफ गट पुन्हा एकदा आमनेसामने



**कोल्हापूर** : कागलमध्ये शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजित घाटगे आणि मंत्री हसन मुश्रीफ गट पुन्हा एकदा आमनेसामने आला आहे. यावेळी राजे विक्रम सिंह घाटगे सहकारी बँक निवडणुकीवरुन हे दोन्ही गट आमनेसामने आल्याचे पहायला मिळत आहे. त्यामुळे आता हा विषय स्थानिक नसून राज्य पातळीवर चर्चेचा विषय ठरला आहे.

राजे विक्रम सिंह घाटगे सहकारी बँक निवडणूक जाहीर झाली आहे. ही निवडणूक जिल्ह्याच्या राज कारणासाठीही महत्त्वाची मानली जाते. राजे विक्रम सिंह घाटगे सहकारी बँकेच्या निवडणुकीत १७ जागांसाठी ४८ अर्ज दाखल झाले आहेत. तर २५ फेब्रुवारी पर्यंत अर्ज माघारीची मुदत आहे. त्यामध्ये समरजित घाटगे यांच्या शाहू ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी तर दुसरीकडे मंत्री हसन मुश्रीफ गटाच्या कार्यकर्त्यांनी देखील अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे आता या निवडणुकीत कोणी माघार घेते का? की अटितटिच्या लढाईत कोण बाजी मारतो? हे पाहणे औत्सुकतेचे ठरणार आहे.

राजे विक्रम सिंह घाटगे सहकारी बँक निवडणूक असताना समरजित घाटगे गटाने नियम बदलल्याचा आरोप मंत्री हसन मुश्रीफ गटाने केले आहे. इतकेच नाही तर त्यामुळे ही बँक निवडणूक थांबवा, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. यासाठी मंत्री सहन मुश्रीफ गटाने विभागीय सहनिबंधकांकडे धाव देखील घेतली आहे. तशी मागणी करणारे पत्रच त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहे.

मंत्री हसन मुश्रीफ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते समरजीत घाटगे यांच्यावर खालच्या भाषेत टीका केली होती. या टीकेला समरजीत घाटगे यांनी प्रत्युत्तर देत हसन मुश्रीफ यांनी पालकमंत्री पदासाठी नात्यांचा सौदा केला, असा घणाघाती आरोप केला होता. या वेळी समरजीत घाटगे म्हणाले होते की, शरद पवार साहेब हसन मुश्रीफ यांना आपल्या चिरंजीवाप्रमाणे वागणूक द्यायचे. सुप्रिया ताई त्यांना मोठ्या भावाप्रमाणे राखी बांधायच्या. एकेकाळी हे त्यांचे कुटुंब होते. पण त्यांनी ईडी आणि पालकमंत्रीपदासाठी शरद पवार, सुप्रिया सुळेंसोबतच्या नात्यांचा सौदा केला. यामुळे त्यांना फस्ट्रेशन आले. जे शब्द वापरले गेले त्याच्यावर लक्ष देण्याऐवजी ते शब्द का वापरले गेले यावर जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असेही घाटगे म्हणाले होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ फेब्रुवारी २०२५

## संजय राऊतांच्या टीकेला दादा भुसेंचे जोरदार प्रत्युत्तर ....



**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नवी दिल्लीमध्ये सरहद संस्थेकडून महादजी शिंदे राष्ट्रगौरव पुरस्कार देण्यात आला. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. मात्र, यावरून ठाकरे गटाने नाराजी व्यक्त केली. तसेच संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे यांना मिळालेल्या या पुरस्कारवर टीका केली आहे. यावर तू असाच जळत रहा, एवढेच मी बोलेन, अशी टीका शिंदे गटाचे नेते व राज्याचे मंत्री दादा भुसे यांनी केली आहे.

दादा भुसे म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अथक कष्ट करत शून्यातून हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने मार्गक्रमण केलेले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराने दिल्ली येथे शरद पवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या गोष्टीचा महाराष्ट्राला आनंद आणि अभिमान वाटला पाहिजे.

पुढे दादा भुसे म्हणाले, परंतु काही लोकांच्या पोटात कायमचा गोळा आहे. एकनाथ शिंदे आणि आम्ही सर्व एकत्र असतानाही त्यांच्या पोटात गोळा होता, रोज त्यांची मळमळ बाहेर येते. हे भाकरी खातात मातोश्रीची आणि चाकरी करतात शरद पवारांची. मात्र एकनाथ शिंदे यांचा त्यांनी गौरव केला तरी यांच्या पोटात पुन्हा गोळा उठला. यांच्याबद्दल न बोललेले बरे. तू असाच जळत रहा, एवढेच मी बोलेन, असे म्हणत संजय राऊत यांच्यावर दादा भुसे यांनी जोरदार निशाणा साधला आहे.

ज्यांनी बाळासाहेबांची शिवसेना फोडली अशा लोकांच्या सन्मानासाठी पवारांनी जायला नको होते, अशा शब्दात संजय राऊतांनी नाराजी व्यक्त केली. केवळ टीका करूनच संजय राऊत थांबले नाहीत तर दिल्लीतल्या मराठी साहित्य संमेलनालाच त्यांनी दलालांचे संमेलन ठरवून टाकले. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने कोणाचाही सन्मान केला जातोय हा मराठीचा घोर अपमान असल्याचे राऊत म्हणाले.

## राज ठाकरे स्पीड ब्रेकर बनत नाहीत - सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर :** भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांच्या भेटीवर प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरे स्पीड ब्रेकर बनत नाही तर सूचना करतात, मार्गदर्शन करतात. त्यांच्या सूचना रास्त असतील तर सरकारने त्या मान्य कराव्यात, असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांची ही भेट म्हणजे संवाद आहे. आम्ही निवडणुका सोबत लढलोच पाहिजे असे आवश्यक नाहीये. मात्र ज्यांची वैचारिक भूमिका आमच्या विरोधात आहे. त्यांच्या मनापर्यंत हा विचार पोहोचला पाहिजे की प्रखर राष्ट्रवादासाठी, परिवाराचा विचार करण्याऐवजी देशाचा विचार करणाऱ्यांनी एकत्र बसून विचार केला पाहिजे. काही पक्ष फक्त राज्याच्या विकासात स्पीड ब्रेकर बनतात.

अमित ठाकरे यांना विधान परिषदेवर घेण्याबाबत कोर टीममध्ये काही चर्चा झालेली नाही. राज ठाकरे स्वतःच्या मुलाचा विचार करणार नाहीत. त्यांना विचार करायचा असेल तर ते आपल्या पक्षातल्या एखाद्या सहकाऱ्याचा विचार करतील, असेही सुधीर मुनगंटीवार म्हणाले. पुढे बोलताना मुनगंटीवार यांनी अजित पवारांनी राज ठाकरे यांच्यावर केलेल्या विधानावर देखील भाष्य केले आहे.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, अजित पवार यांनी मनसे बाबत जे वक्तव्य केले आणि दुरावा निर्माण झाला म्हणताय तर त्याबाबत अजित पवार यांनी चर्चा केली पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांनी चर्चा करून काय फायदा, अजित पवारांच्या नेतृत्वावर मनसेने प्रश्नचिन्ह उभे केले आहे. त्यामुळे अशा प्रकारचे उत्तर त्यांच्याकडून अपेक्षितच आहे.

पंकजा मुंडे यांनी मुंडे समर्थकांचा वेगळा पक्ष तयार होईल असे विधान केले होते. यावर देखील सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, आमच्या पंकजाताई अतिशय साध्या नेत्या आहेत. मात्र त्या जेव्हा काही बोलतात त्याचा अन्वयार्थ काढल्या जातो. भाजपला मोठे करण्यात गोपीनाथ मुंडे यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे गोपीनाथजींना चाहणारे तर लाखोंच्या संख्येत असणारच आहेत. पण त्यांचा पक्षच भाजप आहे, त्यामुळे प्रश्नच उपस्थित होत नाही.

आपत्ती व्यवस्थापन समितीमधून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डावलण्यात आले आहे. यावर बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मला त्या जीआरची माहिती नाही. मात्र आपत्ती व्यवस्थापन समितीमध्ये वित्त विभागाचे मंत्री म्हणून अजित पवार असू शकतात. पैसे देण्याचा ज्या ठिकाणी विषय असतो तिथे वित्तमंत्री असतात. उपमुख्यमंत्री म्हणून जर तुम्ही विचार केला तर हा एकनाथ शिंदेंवर अन्याय होईल, त्यामुळे एकनाथ शिंदेंना डावलण्याचा विषयच नाही. जर उपमुख्यमंत्री हे वित्तमंत्री नसते तर तेही कदाचित या समितीत नसते. आपत्ती व्यवस्थापनामध्ये सरकार अशी आपत्ती कदापिही ओढवून घेणार नाही, असे ते म्हणाले आहेत.




## शरद पवार साहेबांनी विश्वासघात केला - विनायक राऊत



**मुंबई :** शरद पवार यांच्या हस्ते मंगळवारी दिल्लीमध्ये एकनाथ शिंदे पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गट चांगलाच आक्रमक झाला आहे. संजय राऊत यांनी आज सकाळी माध्यमांशी बोलताना शरद पवारांवर जोरदार हल्ला चढवला होता. यावर प्रतिक्रिया देताना विनायक राऊत यांनी शरद पवारांवर मोठा आरोप केला आहे. संजय राऊत साहेब जे बोलले ते अगदी बरोबर आहे. शरद पवारांनी विश्वासघात केला, असा आरोप विनायक राऊत यांनी केला. विनायक राऊत यांनी राजन साळवी यांच्या राजीनाम्यावरही प्रतिक्रिया दिली. उदय सामंत यांना शह देण्यासाठी शिंदेंनी साळवींना सोबत घेतले, असे ते म्हणाले.

शरद पवार यांनी विश्वासघात केला असा आरोप विनायक राऊत यांनी केला. शरद पवार साहेबांनी गद्दार आणि बेईमान व्यक्तीचा सन्मान केला आहे. यावर जे संजय राऊत साहेब बोलले ते अगदी बरोबर आहे. राऊत साहेब सत्य आहे ते बोलले आहेत. शरद पवार साहेबांवर विश्वास ठेवला होता, पण विश्वासघात झाला, असे राऊत म्हणाले. यावर आता राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून नेमकी काय प्रतिक्रिया येते हे पाहावे लागणार आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते राजन साळवी हे पक्ष सोडणार अशी चर्चा काही दिवसांपासून सुरू होती. त्यातच आज त्यांनी आपल्या उपनेते पदाचा राजीनामा दिला आहे. ते आता एकनाथ शिंदे यांच्या पक्षात जाणार असल्याचे म्हटले जात आहे. यावरून ठाकरे गटाचे नेते आणि माजी खासदार विनायक राऊत यांनी राजन साळवींवर निशाणा साधला आहे. सामंत कुटुंबाला शह देण्यासाठी कुणीतरी पाहिजे म्हणून एकनाथ शिंदे यांनी हा केविलवाणा प्रयत्न राजन साळवींच्या माध्यमातून केला आहे, असे विनायक राऊत म्हणाले.

राजन साळवींचा ज्या दिवशी पराभव झाला, त्याच्या दुसऱ्या दिवशी मतदारसंघातील लोकांना भेटून भाजपमध्ये जाण्याच्या वावड्या उठवल्या जात होत्या. आता अत्यंत नामुष्की राजन साळवींवर आली आहे. भाजपने त्यांच्यासाठी दरवाजे बंद केलेच, पण जे राजन साळवी सामंत कुटुंबावर टीका करत होते, आता त्या साळवींवर सामंत कुटुंबाचा नोकर म्हणून काम करण्याची वेळ आली आहे. भाजपमध्ये जायचे आहे, असे किमान १०० पेक्षा अधिक बैठकांमध्ये ते बोलले होते, पैशांनी विकले जाणारे महाशय हेच आहेत. उदय सामंत यांना शह देण्यासाठी कुणीतरी पाहिजे म्हणून एकनाथ शिंदे यांनी हा केविलवाणा प्रयत्न राजन साळवींच्या माध्यमातून केला आहे, असे राऊत म्हणाले.

आजपर्यंत त्यांच्या प्रत्येक गोष्टीला आम्ही सन्मान दिला आहे. उद्धव ठाकरे यांनी एक तास बसून त्यांच्यासोबत चर्चा केली. पराभव झाल्याच्या दुसऱ्या दिवशी राजन साळवींनी बैठक घेऊन भाजपमध्ये जायचे आहे असे सांगितले होते, असा दावा विनायक राऊत यांनी केला. आजपर्यंत ते माझ्यावर सगळ्या गोष्टींचे खापर फोडत होते. आता त्यांनी पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारली आहे, असेही ते म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ फेब्रुवारी २०२५


## सरकार चित्रपट उद्योग उद्ध्वस्त करत आहे - जया बच्चन



समाजवादी पक्षाच्या खासदार जया बच्चन यांनी राज्यसभेत चित्रपट उद्योगाचा मुद्दा उपस्थित केला आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ वरील सर्वसाधारण चर्चेदरम्यान त्यांनी सरकारवर चित्रपट उद्योग उद्ध्वस्त केल्याचा आरोप केला आहे. तसेच, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना उद्योगाला मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.राज्यसभेत २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेदरम्यान बोलताना जया बच्चन म्हणाल्या, 'तुम्ही एका उद्योगाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. सरकारे हे पूर्वीही करत आली आहेत. आणि आज ते खूप जास्त आहे. जेव्हा तुम्हाला गरज असेल तेव्हा तुम्ही त्यांना (उद्योगाला) बोलावता. फोटो काढतात आणि नंतर त्याकडे दुर्लक्ष करतात. चित्रपट उद्योगाबद्दल तुमचे काय मत होते? जीएसटी बाजूला ठेवा. परिस्थिती इतकी वाईट आहे की सर्व सिंगल स्क्रीन बंद करण्यात आल्या आहेत. लोक छोट्या पडद्यावर चित्रपट पाहण्यासाठी जात नाहीत. कारण सगळंच खूप महाग झालं आहे. तुम्हाला हा उद्योग संपवायचा आहे का?सरकारवर आरोप करत जया म्हणाल्या की, आजचे सरकार उद्योग पूर्णपणे नष्ट करू इच्छित आहे. हा एकमेव उद्योग आहे जो भारताला उर्वरित जगाशी जोडतो. रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांचे जगणे कठीण झाले आहे. मी चित्रपट उद्योगाच्या वतीने बोलत आहे. मी सरकारला चित्रपट उद्योगावर दया दाखवण्याचे आवाहन करत आहे. मी अर्थमंत्र्यांना याचा विचार करण्याची आणि उद्योगाला मदत करण्याची विनंती करते.

## आडवाणींच्या लढ्याला आज भाजपच्या लेखी शून्य महत्व - अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर** : जगभरात लॉर्ड ऑफ वॉर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वादग्रस्त आर्म डीलर अभिषेक वर्मा याने शिंदे गटात प्रवेश केला आहे. या अभिषेक वर्मावर भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी आणि भाजपने गंभीर आरोप केले होते. त्यावरून आता विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी भाजप व शिंदे गटाला फटकारले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. अंबादास दानवे यांनी लिहिले आहे की, शस्त्र व्यापार विश्वात ज्यावर मागे मोठे आरोप झाले असा अभिषेक वर्मा हा शिंदे गटात गेला आणि तो राष्ट्रीय समन्वयकही झाला. मुळात वर्मावर २००६ साली आज शिंदेंचे छत्र असलेल्या भारतीय जनता पक्षाने त्यावर मोठे आरोप केले होते.

अंबादास दानवे म्हणाले की, शस्त्र व्यापार विश्वात ज्यावर मागे मोठे आरोप झाले असा अभिषेक वर्मा हा शिंदे गटात गेला आणि तो राष्ट्रीय समन्वयकही झाला. मुळात वर्मावर २००६ साली आज शिंदेंचे छत्र असलेल्या भारतीय जनता पक्षाने त्यावर मोठे आरोप केले होते. या आरोपानंतर वर्माने भाजपचे ज्येष्ठ नेते लाल कृष्ण अडवाणी यांच्यावर खटलादेखील भरला होता. मग आज अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस हे अडवणींवर भरलेला हा खटला विसरले आहेत की अभिषेक वर्मा हा माणूस त्यांच्या स्मरणातून गेला. म्हणून की काय भाजपची उपशाखा असलेल्या शिंदे गटात वर्मा सारखे लोक प्रवेश करतात आणि पदही मिळवत आहेत. असे असेल तर लाल कृष्ण अडवाणी यांच्या लढ्याला आज भाजपच्या लेखी शून्य महत्व राहिले आहे!

## तानाजी सावंतांवर गुन्हा दाखल करा - ठाकरे गटाची सिंहगड पोलिसांत तक्रार





**पुणे** : शिंदे गटाचे आमदार तानाजी सावंत यांच्याविरोधात सिंहगड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी ही तक्रार दिली असून तानाजी सावंत यांच्यावर शासकीय यंत्रणांचा गैरवापर करण्यात आल्याचा आरोप केला आहे. यामुळे तानाजी सावंत यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तानाजी सावंत यांचा मुलगा पुण्यातून गायब झाल्यानंतर तयार झालेल्या अपहरण नाट्यावर पडदा पडला होता. तो बँकॉकसाठी चार्टर विमानाने निघाला असल्याची माहिती समोर आली होती. यानंतर तानाजी सावंत यांनी आपली राजकीय ताकद पणाला लावली. पोलिसांनी तपासची चक्रे फिरवल्यानंतर हे विमान 8 तासांत पुणे विमानतळावर परतले. तानाजी सावंत यांचा मुलगा ऋषिराज यांच्यासोबत त्याचे दोन मित्र देखील होते. यादरम्यान ऋषीराज सावंत यांनी जवळपास 68 लाख रुपये खर्च केल्याचे समजते. यावरुन विरोधकांकडून तानाजी सावंतांसह सरकारवर टीकेची झोड उठली होती. आता ठाकरे गटाच्या वतीने तानाजी सावंतांवर गुन्हा दाखल करण्यातची मागणी करत सिंहगड पोलिसांना निवेदन दिले आहे.

तानाजी सावंत यांच्यावर सरकारी यंत्रणेचा गैरवापर केला आहे. त्यांनी प्रशासनाचा जो वेळ वाया घातला त्याबाबत त्यांच्यावर कारवाई करावी तसेच ज्यांनी पोलिस ठाण्यात अपहरणाची तक्रार दिली त्यांच्यावर देखील कारवाई करावी, या मागणीचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सिंहगड पोलिस ठाण्यात देण्यात आले. कुटुंबातील भांडणामुळे घरी कोणालाही न सांगता बँकॉकला जात असलेल्या मुलासाठी माजी मंत्री तानाजी सावंत यांनी सगळी पोलिस यंत्रणा व सरकारी यंत्रणा कामाला लावली, यासाठी झालेला सर्व खर्च त्यांच्याकडून वसूल करावा, अशीही मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

संतोष देशमुख यांचा हत्येली आरोपी अजून सापडत नाही. मात्र आठ तासात तानाजी सावंत यांचा मुलगा कसा सापडतो? असा प्रश्न देखील शिवसैनिकांनी उपस्थित केला. निवेदन देताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख गजानन थरकुडे, शहर प्रमुख संजय मोरे, शिवसेना नेते वसंत मोरे, रेखा कोंडे आदी उपस्थित होते.

तानाजी सावंतांच्या मुलाच्या अपहरण नाट्यावर विरोधकांकडून टीका केली जात आहे. मुलगा घरातून भांडण करून निघून गेला अशा वेळी केवळ त्या मुलाला अडवायचे असल्याने सर्व पोलिस यंत्रणा कामाला लावणे गरजेचे होते का? असा प्रश्न ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केला होता. आपण सत्तेत असल्याचा, आमदार असल्याचा, पैसा असल्याचा, या सर्व गोष्टीचा गैरवापर करत अपहरणाची खोटी केस दाखल करून घेतली आणि चेन्नईहून मुलाला परत आणले. गोरगरीब नागरिकांचा साधा तक्रार अर्ज देखील पोलिस ऐकून घ्यायला तयार होत नाहीत. अशावेळी धन्य ते मंत्री महोदय, धन्य ते पोलिस स्टेशन आणि धन्य ते सरकार, असे सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे.

अवघ्या आठ तासांत तानाजी सावंत यांच्या मुलाचा शोध लावणाऱ्या पोलिस यंत्रणेसह, महायुती सरकारवर कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी टीका केली. व्हीआयपीच्या मुलाबाबत पोलिसांनी जेवढी तत्परता दाखवली, तेवढी सरपंच संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्याबाबत का दाखवली नाही, असा सवालही त्यांनी केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे बडे नेते तथा माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचा मुलगा ऋषीराज सावंत यांचे अपहरण झाल्याचा दावा केला जात आहे. ऋषिकेश सावंत हे पुणे विमानतळ परिसरातून बेपत्ता झालेत. त्यांचे पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट गाडीतून आलेल्या 4 जणांनी अपहरण केल्याचे सांगितले जात आहे. पुणे पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर घटनेचा तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चारच्या सुमारास माहिती मिळाली की तानाजी सावंत यांच्या मुलाला कोणीतरी घेऊन केले आहे. ही माहिती मिळाल्यानंतर तात्काळ सर्व टीम ऍक्टिव्हेट झाली आहे. त्यानंतर तातडीने यांची माहिती मिळवणे सुरू झाली आहे. ते पुण्यावरून फ्लाईटमध्ये गेले आहेत आणि फ्लाईट आता कोणत्या देशाने चालले आहे याबाबत कन्फर्मेशन मिळवणे सुरू आहे. तसेच त्यांना परत आणण्यासाठी सर्व यंत्रणा लागली आहे. या संदर्भात किडनॅपिंगची एफआयआर दाखल करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ फेब्रुवारी २०२५


# क्रांतिकारी व मानवतावादी संत : संत रविदास

संतांची परंपरा खूप मोठी आहे. अनेक संत होऊन गेले. परंतु या देशात जी चातुवर्ण्यव्यवस्था निर्माण केली त्याच व्यवस्थेचे वाहक अनेक संत बनले.देव, धर्म, जात, रुढी, परंपरा, कर्मकांड, अंधश्रद्धा अशा अनेक गोष्टी घेऊन जगले. या व्यवस्थेने जसे वागविले तसेच ते राहिले. उघड्या डोळ्याने अनेक दीन दलित अस्पृश्य बांधवांचे होत असणारे शोषण, त्यांना मिळत असणारी वागणूक त्यांनी पाहिली. परंतु त्याविरुद्ध मात्र आवाज उठविण्याचे काम बोटावर मोजण्याइतक्या संतांनीच केले.जातिव्यवस्थेवर, अंधश्रद्धा, कर्मकांडावर प्रहार केले. 'माणुस' केंद्रस्थानी मानून त्याला न्याय मिळवून देण्यासाठी कार्य केले. त्या अनेक संता पैकी संत रविदास हे आहेत. संत रविदास यांचा जन्म उत्तर प्रदेशातील काशिजवळ असलेल्या मांडुर या गावी झाला. त्यांनी आपल्या परिवर्तनशील विचार कार्याचा प्रचार आणि प्रसार वेगवेगळ्या राज्यात नेऊन पोहोचविला होता. त्यामुळे त्यांना वेगवेगळ्या राज्यात विविध नावाने ओळखले जाते. रोहिदास, रूइदास,रूयदास,रैदास, रविदास अशी विविध पंधरा ते सोळा नावे आहेत. संत रविदास यांच्यावर लहानपणापासूनच चांगले संस्कार झाले असल्याकारणाने माणसाने सत्याच्या मार्गाने आपले कार्य करावे, चांगले काम करावे असे त्यांना नेहमी वाटत असे. संत रविदास यांनी आपल्या साहित्याच्या, दोहेच्या माध्यमातून समाजाला केलेला उपदेश महत्त्वपूर्ण आहे. समाजाने सत् मार्गावरून चालावे हा त्यांचा उपदेश आजही फार मोलाचा वाटतो आहे. खरेतर कुठल्याही शाळेत न गेलेले संत रविदास यांनी लहानपणी अध्यात्माचे शिक्षण घेतले. वेद, शास्त्र याची माहिती जाणली.संत रविदास हे चांभार जातीत जन्माला आले असल्याकारणाने त्यांना शूद्र समजले जाई.शुद्राने अध्यात्म, वेद, पुराणांचा अभ्यास करणे म्हणजे धर्म बुडविणे किंवा धर्मबाह्य काम करणे असे समजले जाई. त्यामुळे त्यांना ब्राह्मण वर्गाकडून प्रचंड मोठ्या प्रमाणावर विरोध होऊ लागला.गंगास्नान प्रकरण आणि संत रविदासांचा विद्रोहगंगास्नान प्रकरणावरून ईश्वर सेवा करणाऱ्या संत रविदास यांना चातुर्वर्ण्यव्यवस्थेची झळ प्रचंड मोठ्या प्रमाणावर बसली.त्यांना जातीयता, धर्मांधता व विषमता कळली. माणसासारख्या माणसाला तुच्छ आणि हीन वागवले जाते याची जाणीव त्यांना झाली. त्या गंगेत शूद्रांना स्नान करण्यास मनाई केली होती. तरीही संत रविदास तिकडे गेले व उच्चवर्णीयांनी म्हणजेच ब्राह्मणांनी दिलेली वागणूक, त्यांचे बोलणे ऐकून त्यांच्या जिव्हारी लागले. त्यांना जातीयतेचा अनुभव आला. त्यामुळे संत रविदासांनी ही त्यांना त्याच वेळी सुनावले की, जो वेगवेगळ्या जाती मानतो तो धर्मद्रोही समजावा.आम्ही सर्वांना समान मानतो. स्वार्थी व अभिमानी असणारे असले उच्चवर्णीय पापी आहेत जे धर्माचे ढोंग करतात. संत रविदासांची नि:स्वार्थी सेवासंत रविदास आपल्या आयुष्यात जे कोणतेही कर्म करीत ते मात्र अगदी मनापासून आणि नि:स्वार्थ भावनेने करत असत. कुठलीही आशा, अपेक्षा स्वार्थ मनामध्ये न ठेवता प्रामाणिकपणे कार्य करत असत. आजच्या परिस्थितीत संत असो किंवा समाजसेवा करणारा नेता असो त्यांच्यात अशी निस्वार्थीपणाची भावना दिसून येत नाही. अनेक संतांनी जे कार्य केले त्यातही त्यांचा स्वार्थ दिसून येतो. संत रविदास यांची घरची आर्थिक परिस्थिती बेताची होती.ते स्वतः पादत्राणे बनवूनच उदरनिर्वाह करीत असत. कुणाच्या कुठल्याही आमिषाला बळी न पडता आपला व्यवहार ते पार पाडत असत. आपली आर्थिक स्थिती, परिस्थिती सुधारावी व येणाऱ्या चार पाच पिढींची कमाई करून ठेवावी ही भावना त्यांच्या मनात कधीच आली नाही. त्यामुळे आजच्या प्रसंगीही संत रविदास यांचे विचार मार्गदर्शक आहेत. त्यांनी आपले जोडे बनविण्याच्या धंद्यात कधीही कमीपणा बाळगला नाही. ते काम प्रामाणिकपणे करूनच उदरनिर्वाह भागवत असत. त्यांच्या अनुयायांमध्ये राजघराण्यातील व्यक्ती असतानाही त्यांनी कधीच कुणाकडून काही भेटवस्तू स्वीकारली नाही. संत मीराबाई ह्या संत रविदास यांच्या शिष्या होत्या. त्याही राजघराण्यातील होत्या. संत मीराबाई यांनी चांभार समाजातील संत रविदास यांना गुरु केले. त्यामुळे संत मीराबाई यांना लोक विविध प्रकारे दुषणे देत असत. त्यांची निंदा करत असत. संत मीराबाई यांना आपल्या गुरूला म्हणजे संत रविदास यांना एक मौल्यवान हिरा भेट देण्याचा प्रयत्न केला. परंतु संत रविदासांनी संत मीराबाई यांना समजावून सांगितले. लोक तुझी मला गुरु केले असल्याकारणाने निंदा करत असतील तर माझ्याकडे येणे सोडून दिले तरी चालेल परंतु मला अशी कोणतीच गोष्ट नको आहे. असे संत रविदासांनी प्रामाणिकपणे सांगितले. द्रोणाचार्यांनी ज्याप्रमाणे एकलव्याचा अंगठा कापून घेऊन एकलव्याला संपवून टाकण्याचे षड्यंत्र केले तसे संत रविदासांनी अजिबात केले नाही.ही खरी नि:स्वार्थ सेवा संत रविदासाची आहे. संत मीराबाई यांनी जो हिरा देण्याचा प्रयत्न केला तो संत रविदास यांनी नाकारल्यानंतर संत मिराबाईंनी झोपडीच्या छपरात हिरा खोचून ठेवला. परंतु संत रविदास यांनी मात्र त्याकडे कधीही पाहिले नाही. ही भावना आजच्या काळात भौतिक सुखांमध्ये गडून जाणाऱ्या प्रत्येक माणसाला, संतांना, समाजसुधारकांना मानवतेचा धडा शिकवणारी आहे.समाजमनावर संत रविदासाचा प्रभावसंत रविदास हे चांभार जातीत जन्माला आले असल्याने आणि त्यांच्यावर अध्यात्माचे संस्कार असल्यामुळे ते इतरांना उपदेश करत असत. त्यामुळे त्यांचा प्रभाव समाज मनावर पडत असे. खालच्या जातीत संत रविदास यांचा जन्म झाला असल्यामुळे त्याकाळी अध्यात्म क्षेत्रात वर्चस्व असणारा ब्राह्मण वर्ग त्यांना कमी लेखत असे. त्यांचा छळ करत असे. खालच्या जातीतील लोकांनी अध्यात्मिक उपदेश करणे, पूजा करणे हे धर्मबाह्य समजले जायचे. अपवित्र समजले जायचे. परंतु त्याला कुठल्याही प्रकारे भीक न घालता न जुमानता संत रविदासांनी संपूर्ण भारतभर प्रवास करून वेशीबाहेर राहणाऱ्या, तळागाळातील लोकांचे प्रबोधन केलेले दिसून येते. अनेक उच्चवर्णीयांना त्यांनी वादविवादात पराजयही केले. त्याचबरोबर त्यांनी अन्याय,अत्याचार,शोषण, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा,कर्मकांड यासाठीही संघर्ष करून सामान्य जनतेला या मरणयातनेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. वेळप्रसंगी त्यांनी स्वार्थी असणाऱ्या सनातन्यांच्या विरोधात दंड थोपटलेलेही दिसतात. त्यामुळे त्यांनी केलेल्या समाज कार्याचा प्रचार आणि प्रसार सामान्यांच्या जनमनावर झालेला दिसून येतो. सत्त्याच्या(खरेपणाच्या) जोरावर, विचारावर चालून संघर्ष करूनच त्यांनी मान-सन्मान आणि सर्वोच्च स्थान मिळविले. त्यांनी समाजात बंधुभाव निर्माण होण्यासाठी विचारांच्या माध्यमातून प्रबोधन केले. त्यामुळे समाजात त्यांचे एक आदराचे स्थान निर्माण झाले.जातीयतेच्या महारोगात अडकू नकासंत रविदास यांनी आपल्या काव्यातून आणि दोहे यातून समाज जागृती घडवून आणली आहे. त्यातून समाजाला काही संदेश दिले आहेत.उपदेश केले आहेत. खरे तर आजही देश जातीच्या आणि धर्माच्या गराड्यात प्रचंड अडकला आहे. आजही सर्व सामान्य माणसांना जातीच्या आणि धर्माच्या विळख्यात अडकवले जाते आहे. सर्व सामान्य माणसं त्यात बळी पडत आहेत. आजचे संत, समाजसुधारक, नेते हेही त्यांना जातीयतेच्या चक्रव्यूहात अडकून त्यांचे प्रचंड नुकसान करत आहेत. भेदभावाची कल्पना, विषमताही त्यांच्या मनात विविध प्रकारच्या माध्यमातून पेरत आहेत. माणूस जाती जातीमध्ये विभागला जात आहे. खरे तर यासाठी तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी खूप प्रयत्न केले आहेत. जातीयता देशाला लागलेला कलंक आहे. तो पुसून टाकण्यासाठी त्यांनी खूप कष्ट उपसले आहेत. तरीही आज सगळ्याच क्षेत्रात जातीयतेचेच स्तोम माजलेले आहे. म्हणून आजच्या काळातही संत रविदास यांचा विचार हा सर्वच मानव प्राण्यांना दिशादर्शक आहे. सत्याचा प्रकाश दाखवणारा आहे. खरेतर संत म्हणजे सज्जन. हे संत कोण्या एका जातीचे धर्माचे नसतात तर ते संपूर्ण मानव जातीचे असतात. त्यासाठी काही बोटावर मोजता येतील असे संत आहेत की त्यांनी या व्यवस्थेला हादरा दिला आहे. त्यापैकी संत रविदास हे एक आहेत. ते म्हणतात की जातीच्या जाळ्यात अडकणारा माणूस समाजाचे आणि माणसाचे कल्याण करू शकत नाही. माणुसकीपासून आणि माणसापासून तुटत जातो. त्यामुळे ते आपल्या एका दोह्यात म्हणतात की,जात-पांत के फेर माहे,उराझि रहइ सभ लोग ।माणूसषता कूं खात हइ ,'रविदास' जात कर रोग ॥सगळी माणसे समानमाणूस जातीने मोठा होत नसतो. परंतु आपल्या देशातली जी व्यवस्था आहे ती काही जातींना उच्च स्थान देते तर काहींना नीच स्थान देते.ही व्यवस्था माणसाला विषमतेची वागणूक देते. विशिष्ट जातीत व विशिष्ट कुटुंबात जन्म झाल्यामुळे मनुष्य उच्च किंवा नीच ठरवला जात असे. परंतु ही गोष्ट संत रविदास यांना मान्य नव्हती. ते म्हणतात की, परमेश्वराची लेकरे जर असतील तर ती समान असलीच पाहिजे. मग त्यामध्ये विषमता का? जातीने कोणीही श्रेष्ठ ठरत नसतो तर माणूस जो कर्म करत असतो ते चांगले की वाईट यावर त्याचे श्रेष्ठत्व अवलंबून असते. खरे तर माणूस नीच जातीत जन्माला आला आणि तो सदगुणी असेल, विचारी असेल तर त्याची पूजा करा. जो ब्राह्मण आहे आणि सदगुणी नाही त्याची पूजा करू नका असे संत रविदास सांगतात. ते म्हणतात की,रविदास, ब्राह्मण मत पुजिए,जउ होवे गुनहीन ।पुजिहि चरण चंडाल के, जउ होवै गुन परवीन ॥हिंदू मुसलमान एकसंत रविदास यांची दृष्टिही मानवतेची आहे. क्रांतिकारकाची आहे. सत्य विचाराने आणि मार्गाने पुढे चालणारी आहे. द्वेष भावनांचा नाश करणारी आहे. आजही देशात हिंदू मुसलमान नावावरून राजकारण केले जाते. भेदाभेद केला जातो. विषमता पेरली जाते. मत मागितले जाते. एकमेकांच्या मनात जातीयतेचे विष पेरले जाते. माणसांची मने विषारी केली जातात. धर्माच्या नावावरून सत्ता मिळवली जाते. त्यासाठी वाट्टेल ती खालची पातळी गाठली जाते. संत रविदास यांना हे मान्य नाही. ते म्हणतात की , हिंदू मुसलमान या दोघांचीही शरीर सारखेच आहे. रक्तही जर सारखेच आहे. दोन हात, दोन डोळे, दोन कान, दोन पाय आहेत मग ते दोघे एक दुसऱ्याहुन वेगळे कसे? वास्तविक पाहता ते दोघे एक रूप एक समान आहे अशी राष्ट्रीय एकात्मतेची भावना संत रविदास समाज रूपी माणसांच्या मनात निर्माण करतात. ते म्हणतात की,जप सभ करी दोउ हात पग,दोउ नैन दोउ कानरविदास,पृथक कैसे भये हिंदू मुसलमान ॥ संत कबीरांचे गुरु बंधू म्हणून संत रविदासाकडे पाहिजे जाते. स्वामी रामानंद हे संत रविदासांचे गुरु. रामानंद हेही एक मोठे क्रांतिकारक, समाजसुधारक होते. उत्तर भारतात रामानंदाने जातिबंधने ढिली केली. स्त्रियांनाही शिष्यत्व दिले. त्यामुळेच संत रविदास यांनाही ते गुरू करता आले. रामानंदाचाच परिवर्तनाचा विचार संत रविदास यांनी पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. पारतंत्र्याविषयीची चीडही संत रविदासांच्या मनात होती. त्यामुळे त्यांनी साहित्यातून बंडखोरी ही केलेली दिसून येते.सत् मार्गाचा अवलंब केलेला दिसून येतो. भारतात ज्यावेळी मुस्लिम आक्रमण होते त्यावेळी त्यांचे पारतंत्र्य संत रविदास यांना आवडले नाही. पारतंत्र्य दूर करण्यासाठी निर्भय बनले पाहिजे. गुलाम होणे पाप आहे. गुलामीत जीवन जगणारे हे कधीही परिवर्तन घडवून आणू शकत नाहीत. म्हणून त्या विषयी ते म्हणतात की,पराधीनता पाप है जान लेहू रे मीतरविदास दास पराधीन तो कौन करे है प्रीत ॥समाजवादी विचारसरणीसंत रविदास यांनी समाजवादी विचारसरणी मांडली. समाजवादी विचारसरणी म्हणजे समाजात समता असावी अशा आशयाचे तत्त्वज्ञान. समता पेरण्यासाठी संत रविदासांनी खूप प्रयत्न केले.विषमतेने त्यांचे मन विषण्ण झाले होते. त्या अनुभवातून ते गेले होते. त्यामुळे त्यांनी या विचारसरणीचा पुरस्कार केला आहे. समाजात राहणाऱ्या सर्वांना समान लेखले जावे, त्यांचे कल्याण व्हावे, सर्वांना खायला मिळावे, सगळे एक समान असावे, लहान मोठे असा भेदभाव नसावा, गरीब श्रीमंती असाही भेदभाव नसावा अशी भावना संत रविदास यांची होती.

**उर्वरित पुढील पानावर**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ फेब्रुवारी २०२५

**मागील पानावरून -** परंतु आजचे राज्यकर्ते इतक्या खालच्या पातळीवर जाऊन निर्माण करताना दिसतात.त्यांनी जर त्यांचाच विचार केला तर निश्चितच त्यांना स्वतःला शरमेने मान खाली घालायला लावणारी त्यांची विचारसरणी आहे. म्हणून आजच्या स्वार्थी राज्यकर्त्यांना ही विचारसरणी धडा शिकवायला लावणारी नाही. संत रविदास यांची विचारसरणी प्रामाणिक आहे. एकनिष्ठ आहे. माणसावर प्रेम करणारी आहे. सगळ्यांचे कल्याण अशी आहे. म्हणूनच गुरु 'ग्रंथसाहेब'या शीख धर्माच्या पवित्र ग्रंथातही संत रविदास यांच्या साहित्यातील जवळजवळ ४० दोह्यांचा सामावेश केला आहे. त्याचे पटनही केले जाते. एकदा संत रविदास यांना गंगा स्नान करण्यासाठी गंगेवर चालण्यासाठी काही लोकांनी आग्रह धरला परंतु एका व्यक्तीला संत रविदास यांनी पादत्राणे बनवून देण्याचे वचन दिले असल्यामुळे मी येऊ शकत नाही असे सांगितले. बोले तैसा चाले अशा प्रकारची भूमिका संत रविदास यांची होती. आजचे समाजसुधारक राज्यकर्ते हे नुसते आश्वासन देणारे आहेत. कृतिशून्य आहेत. म्हणून निश्चितच आजच्या समाजसुधारकांना, राज्यकर्त्यांना ही विचारसरणी मार्गदर्शन करणारी आहे. संत रविदास म्हणतात की,ऐसा चाहो राज्य मे, जहा मिले सबन को अन्न छोट बडो सब सम बसे रविदास रसे प्रसन्न मनाची विशालता हवीआज माणसाचे मन चांगले असेल तरच परिवर्तनाचे काम करता येऊ शकते. चांगले मन म्हणजे नेमके काय? तर चांगले मन म्हणजे शुद्ध मन, पवित्र मन. शुद्ध मन म्हणजे मनामध्ये कुठल्याही प्रकारचा वाईट विचार नसणे होय. आजच्या काळामध्ये माणसाचे मन ही प्रचंड विषारी बनत चालले आहे. संकुचित आणि स्वार्थ बनत चालले आहे. सत्ता, संपत्ती मलाच आणि माझ्या घरातच असायला हवी ही भावना बळावत चालली आहे. आपण खायचे तुपाशी आणि लोकाला ठेवायचे उपाशी भावना त्यांच्या मनात निर्माण होताना दिसते. त्याचबरोबर हल्लीच्या काळात तर अनेकांच्या मनाला जातीने, धर्माने ग्रासले आहे त्यामुळे समाजात प्रचंड मोठ्या प्रमाणावर विषमता निर्माण होताना दिसत आहे. मानवता,माणुसकी, स्वातंत्र्य, समता,बंधुभाव ही मुल्ये गळून पडताना दिसत आहेत, त्यामुळे ही विषमतेची भावना अनेकांच्या जीवनात सुख,समाधान आणताना दिसत नाही. त्यामुळे संत रविदास म्हणतात की,मन चंगा तो कठौती में गंगाडॉ.आंबेडकर आणि संत रविदाससंत रविदास यांनी माणूस केंद्रस्थानी मानून मनूच्या व्यवस्थेवर प्रहार केले, जातिव्यवस्थेवर प्रहार केले. संत रविदास यांनी विज्ञानवादी कार्य, क्रांतीकारक कार्य, तत्कालीन व्यवस्थेविरुद्ध दिलेला लढा, अंधश्रद्धा निर्मूलनाचे केलेले कार्य त्याच बरोबर माणसाला जागृत करण्याचे कार्य महत्त्वाचे आहे. ते आजच्या समाजालाही दिशादर्शक आहे. वेदावर, पुराणावरही त्यांनी कडाडून हल्ले केले. समतेचे राज्य निर्माण व्हावे म्हणूनही त्यांनी प्रयत्न केले. ही बाब डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महत्वाची वाटली. खरेतर संतांच्या संदर्भात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, " संत ज्या जातीत जन्मले व ज्या जातीत वाढले त्याच जातीत मेले. अस्पृश्यतेच्या बाबतीत संत हे सरळ सरळ प्रतिगामी होते." संत रविदासांनी पुरोगामी विचार रुजविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांनी दिल्ली येथे संत रविदास यांची जयंती १५ फेब्रुवारी १९५३ साली साजरी केली. त्याच बरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ऑक्टोबर १९४८ साली लिहिलेला ' दि अन्टचेबल्स 'हा ग्रंथही त्यांनी संत रविदास यांना अर्पण केला आहे. यावरूनही संत रविदास यांच्या कार्याचे मोठेपण आपल्याला दिसून येते.संत रविदासांवर बुद्ध विचारांचा प्रभावतथागत सिद्धार्थ गौतम बुद्धाने आपल्या आयुष्यात माणसाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महान कार्य केले आहे. चातुर्वर्णव्यवस्थेविरुद्धही बुद्धाने लढा दिला आहे. स्त्रियांनाही त्या काळात तुच्छ लेखले जात असताना बुद्धाने आपल्या भिक्खूसंघात स्त्रियांना स्थान देऊन समता प्रस्थापित करण्याचे कार्य केले आहे. जातीभेदाला त्यांनी कधीच थारा दिला नाही. मानवतावाद, विज्ञानवाद व समता पेरण्याचा आटोकाट प्रयत्न बुद्धाने केला. रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यालाही कडाडून विरोध केला. स्वातंत्र्य,समता,बंधुता व न्यायाचे पुरस्कर्ते तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध हे होते. त्याच तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या विचाराने प्रभावित होऊन संत रविदास यांनी कार्य केलेले दिसून येते. देशभर संत रविदास यांनी भ्रमंती करून समस्त बहुजनांना एकत्रित करून बौद्ध धम्म हा विश्वातील सर्वश्रेष्ठ धम्म आहे. मानवतावादी व विज्ञानवादी धम्म आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले आहे.आधुनिक काळातही संत रविदास यांचा विचार अत्यंत महत्त्वाचा, दिशादर्शक आहे. सामान्यातल्या सामान्यांना उजेड दाखवणारा आहे. म्हणून प्रत्येकाने आपल्या जीवनात अशा विचारांची कास धरायला हवी.

**प्रा. डॉ. सतीश मस्के**
प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय,
पिंपळनेर ता.साक्री जि. धुळे ४२४३०६
मो. ९४२३३९७४८४

# संजय राऊत यांच्या थोबाडीत मारायला हवी - संतोष बांगर



**मुंबई :** शरद पवार यांनी चांगल्या माणसाच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे. मात्र, तुमच्या तर थोबाडीत मारायला हवी, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाचे आमदार संतोष बांगर यांनी संजय राऊत यांच्या आरोपाला प्रत्युत्तर दिले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिल्ली येथील साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावरून संजय राउत यांनी केलेला टीकेला हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी विधानसभा मतदार संघाचे आमदार संतोष बांगर यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

शरद पवार यांनी मंगळवारी दिल्लीत आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सोहळ्यात शिवसेनेचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मान केला. त्यांच्या या कृतीमुळे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत चांगलेच संतप्त झाले. त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना या प्रकरणी शरद पवारांवर थेट निशाणा साधला. ते म्हणाले की, राज्याचे राजकारण हे फार विचित्र दिशेने जात आहे. कोण कुणाला टोप्या घालत आहे आणि कोण कुणाच्या टोप्या उडवत आहे, कोण कुणाला गुगली टाकत आहे आणि कोण स्वतः हीट विकेट होत आहे, हे पुन्हा एकदा समजून घ्यावे लागेल. यावरुन आमदार संतोष बांगर यांनी संजय राऊत यांच्यावर पलटवार केला आहे.

या विषयी संतोष बांगर म्हणाले की, कायम गद्दारी गद्दारी असे किती दिवस म्हणत राहणार आहात. आता लोकांनीच कोण गद्दार आहे आणि कोण नाही? दाखवले आहे. गद्दार असतो तर आमचे साठ आमदार निवडून आले असते का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. खरी गद्दारी तुम्हीच केली असल्याचा आरोप देखील संतोष बांगर यांनी संजय राउत यांच्यावर केला आहे.

खरी गद्दारी कोणी केली, हे देखील शरद पवार यांना हे उशिरा समजले आहे. त्यांनी चांगल्या माणसाच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे. तुमच्या तर थोबाडीत मारायला हवी, अशी परिस्थिती असल्याचे आमदार संतोष बांगर यांनी म्हटले आहे. बाळासाहेब ठाकरे हे एकमेव नेते आहेत, ज्यांनी महाराष्ट्राचे नाव गाजवले. तर दुसरे संयमी आणि धुरंधर राजकारणी म्हणून शरद पवार यांचा नंबर येतो, असा दावा देखील आमदार संतोष बांगर यांनी केला आहे. या माध्यमातून बांगर यांनी संजय राउत यांच्यावर पलटवार केला आहे.

# चिकलठाण येथील जिल्हा परिषद शाळेत स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे



**कन्नड (राहुल थेटे) :** कन्नड तालुक्यातील चिकलठाण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पठाण वस्ती गंगाराम नगर येथे वार्षिक स्नेहसंमेलन विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम दिनांक ११ वार मंगळवार रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला शाळा महाविद्यालय स्तरावर वार्षिक स्नेहसंमेलन हा विद्यार्थ्यांसाठी एक हक्काचे व्यासपीठ समजले जाते त्यांच्या कलागुण सादरीकरण करण्यासाठी संधी असते यातूनच अनेक कलावंत उदयास आलेले आहे पहिली ते चौथीपर्यंत लहान विद्यार्थ्यांनी बालगीत, भारुड, लावणी ,देशभक्तीपर ,गीत, गोंधळ गीत, मिक्स सॉंग, खंडोबा गीत, पेरणी गीत, भीम गीत, शिवचरित्र गीत, शिवचरित्र पोवाडा, बालगीते, बडबड गीते ,इत्यादी कलाविष्कार लोकगीते समाजप्रबोधन नाटके आदी यावेळी सादर करण्यात आलेबक्षिसांचा वर्षाव-- या कार्यक्रमास गावकऱ्यांनी भरपूर प्रतिसाद दिला विद्यार्थ्यांना गावकऱ्यांनी पालक, नातलग यांनी यथा शक्ती बक्षीस देऊन त्यांचा उत्साह वाढवला स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थित भारावून गेले यावेळी-- शालेय मुख्याध्यापक शोभा गिरी, अर्जुन निकम शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेश चव्हाण, उपाध्यक्ष शितल चव्हाण, नानासाहेब चव्हाण माजी सैनिक, प्रताप चव्हाण, सलीम सय्यद, भाऊसाहेब चिंधे, मियाखा पठाण, हारिकिसन समिंद्रे, रमेश धनेंधर, प्रवीण साबळे, मनोज ढवळे, सोमनाथ ढवळे, तसेच वस्तीवरील सर्व पालक वर्ग तसेच विद्यार्थी शालेय व्यवस्थापन समिती मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले तसेच शालेय शिक्षक अर्जुन निकम यांनी सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच आलेले सर्व मान्यवरांचे आभार मानले